**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**मंगळवार दिनांक १६ जून २०२६**

**ठळक बातम्या**

1. **पात्र बचत गटांना पाच वर्षांच्या भाडे करारावर एक हेक्टर शासकीय जमीन देण्यात येणार.**
2. **वैद्यकीय निदान प्रणालीतील हाय एनर्जी मेडिकल सायक्लोट्रॉन प्रकल्प नागपूर इथं राबविण्यास राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता.**
3. **डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय खोकल्याच्या औषधाच्या विक्रीवर बंदी.**
4. **नीट युजी फेर परीक्षेच्या पार्श्वभूमीवर टेलिग्रामच्या वापरावर निर्बंध.**
5. **शिक्षण क्षेत्रातील कथित गोंधळाच्या मुद्द्यावरून आज नागपुरात कॉकरोच जनता पार्टीचं आंदोलन.**

------------------------------------------

भाडे करारावर जमीन

राज्यातील महिला बचत गटांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्येक पात्र बचत गटाला पाच वर्षांच्या भाडे करारावर एक हेक्टर शासकीय जमीन देण्यात येणार असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. ते म्हणाले -

***(होल्ड बाईट - चंद्रशेखर बावनकुळे ३४ सेकंद)***

या योजनेअंतर्गत चारा विकास, नेपियर गवत आणि बांबू लागवडीसाठी बचत गटांना डीपीसी किंवा स्थानिक खनिकर्म निधीतून प्रत्येकी एक लाख रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे. एका बचत गटाला या माध्यमातून वार्षिक चार ते पाच लाख रुपयांपर्यंत उत्पन्न मिळू शकेल तर सरासरी दहा महिलांना रोजगार उपलब्ध होणार असल्याचं बावनकुळे यांनी सांगितलं. महसूल विभागाच्या पडीत जमिनींचा उत्पादक वापर आणि महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार असल्याचं त्यांनी नमूद केलं.

------------------------------------------

मंत्रिमंडळ निर्णय

वैद्यकीय उपचारांमध्ये अचूकता यावी यासाठी निदान प्रणालीतील महत्वाचा असा हाय एनर्जी मेडिकल सायक्लोट्रॉन प्रकल्प नागपुरात उभारण्यासाठी आज राज्य मंत्रिमंडळान मान्यता दिली. मध्य भारतातील हा एकमेव महत्वाकांक्षी प्रकल्प विविध रोगांचे, आजारांचे निदान करण्यासाठी महत्वपूर्ण ठरणार आहे. आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्य सरकारनं ग्रामीण पेय जल धोरण देखील जाहीर केलं आहे. या अंतर्गत ग्रामीण भागातल्या पाणी टंचाईच्या प्रश्नावर प्रभावी आणि कायमस्वरुपी उपाययोजना करण्याचं नियोजन आहे. यात पाणी पुरवठ्याच्या विविध योजना एकत्र करुन स्वच्छ, निर्जंतुक आणि दर्जेदार पाणी पुरवठा केला जाणार आहे. विकसित भारत जी रामजी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमात बदल करणारा अध्यादेश जारी करायलाही मंत्रीमंडळानं आज मान्यता दिली. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये राखीव जागांवर निवडून आलेल्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची अंतिम मुदतवाढ राज्य सरकारनं आज दिली. याशिवाय महाराष्ट्र स्वयंचलित प्रणाली धोरण-२०२६ देखील जाहीर करण्यात आलं आहे. या धोरणामुळे जोखमीच्या आणि अवघड परिस्थितीतील कामांसाठी वापरता येणाऱ्या ड्रोनसह, विविध रोबोटसची निर्मिती करण्यासाठी संशोधन, विकास आणि मनुष्यबळ प्रशिक्षण आदी उपक्रमांना प्रोत्साहन मिळणार आहे.

------------------------------------------

खोकल्याचं सिरप

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयान जारी केलेल्या अधिसूचनेनुसार आता डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय औषध दुकानांमधून खोकल्याचं सिरप खरेदी करता येणार नाही. केंद्राच्या नव्या नियमानुसार, औषधी नियम, १९४५ च्या अनुसूची 'क' मधून 'सिरप' हा शब्द वगळण्यात आला आहे. याआधी कोणत्याही औषधी दुकानांतून ग्राहकांना खोकल्याचं सिरप थेट खरेदी करता येत होतं. आता मात्र औषध विक्रेते प्रिस्क्रिप्शनशिवाय खोकल्याचं सिरप विकू शकणार नाहीत. सुरक्षिततेच्या कारणास्तव हा निर्णय घेण्यात आला आहे. खोकल्याच्या अनेक सिरपमध्ये कोडीनसारखे घटक असतात, ज्यांचा गैरवापर होण्याची शक्यता असते. तसच लहान मुलांना चुकीच्या मात्रेत सिरप दिलं जाऊ नये, यासाठीही हा बदल करण्यात आला आहे.

------------------------------------------

उत्पादन शुल्कात वाढ

केंद्र सरकारनं डिझेलच्या आणि हवाई इंधनाच्या निर्यातीवरच्या विशेष अतिरीक्त उत्पादन शुल्कात वाढ केली आहे. डिझेलवरचं हे शुल्क प्रति लिटर ५० पैशांनी वाढवून १४ रुपये प्रति लिटर तर विमान इंधनावरचं शुल्क प्रति लिटर ३ रुपयांनी वाढवून साडे बारा रुपये प्रति लिटर झालं आहे. देशांतर्गत वापराच्या पेट्रोल, डिझेलच्या किंमतीत मात्र सरकारनं काहीही बदल केलेला नाही.

-------------------------------------------

आश्रमशाळा

५ जुलैपर्यंत राज्यातल्या सर्व आदिवासी आश्रमशाळांमधल्या विद्यार्थ्यांना गणवेश दिले जातील, असं आदिवासी विकास मंत्री डॉक्टर अशोक उईके यांनी काल नाशिकमध्ये सांगितलं. विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी प्रत्येक आश्रमशाळेत परिचारिकेची नियुक्ती करण्यात आली आहे, असं उईके म्हणाले.

-------------------------------------------

कामगार कायदा

कामगार कायद्यांच्या नव्या संहितांच्या अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनान राज्यस्तरीय नियमांचा मसुदा तयार केला आहे. हा मसुदा mahakamgar.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. या मसुद्यांबाबत उद्योग क्षेत्र, कामगार संघटना, कर्मचारी; तसच सर्वसामान्य नागरिकांनी सूचना आणि  हरकती नोंदवाव्यात, असं आवाहन करण्यात आलं आहे.

-------------------------------------------

टेलिग्राम ॲपवर बंदी

केंद्र सरकारनं २२ तारखेपर्यंत देशात टेलिग्राम या सोशल मीडिया वेबसाइटच्या वापरावर निर्बंध लादले आहेत. वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेतली जाणारी नीट युजी २०२६ ची फेर परीक्षा २१ जून रोजी होणार असल्यानं इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं हा निर्णय घेतला आहे. आगामी परीक्षेचा पेपर विकण्याचा दावा करणारे अनेक बनावट आणि लोकांची फसवणूक करणारे संदेश या ॲपवर झळकत आहेत. अशाच एका प्रकरणात अहमदाबाद पोलिसांच्या सायबर विभागानं काही जणांना अटक केली आहे. त्यामुळे राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं टेलिग्रामवर निर्बंध लादण्याची शिफारस केली होती. तसंच आगामी नीट यूजी परीक्षेचा पेपर फुटलेला नसून कुणीही या आमिषांना बळी पडू नये, असं एनटीएनं यापूर्वीच स्पष्ट केलं आहे.

-------------------------------------------

कॉक्रोच जनता पार्टी'

नीट पेपरफुटी प्रकरणी केन्द्रीय शिक्षा मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी नागपूर शहरातील संविधान चौक इथं आज 'कॉक्रोच जनता पार्टी'च्या वतीन आंदोलन करण्यात येत आहे. या आंदोलनात शेकडोंच्या संख्येन तरुण सहभागी झाले आहेत. तत्पूर्वी नागपुरात आयोजित पत्रकार परिषदेत कॉक्रोच जनता पार्टी संस्थापक अभिजीत दिपके यांनी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीचा पुनरुच्चार केला.-

***(होल्ड बाईट - दिपके - ३० सेकंद)***

येत्या २० जून ला पुन्हा दिल्लीत आंदोलन करणार असल्याचं दिपके यांनी यावेळी सांगितलं.

------------------------------------------

स्टॉप डायरिया

बालमृत्यू दर कमी करण्यासाठी आणि बालकांमधील अतिसाराचे प्रमाण रोखण्यासाठी भंडारा जिल्हयात आज पासून ३१ जुलै पर्यंत ‘स्टॉप डायरिया’ ही विशेष मोहीम राबविण्यात येत असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन कापसे यांनी दिली. या मोहिमे अंतर्गत जिल्हयातील ५ वर्षां पर्यंतच्या 74 हजार 736 बालकांना ORS आणि झिंकच्या गोळ्यांचे वाटप करण्यात येणार आहे. आशा सेविकांमार्फत प्रत्येक घरी भेट देऊन बालकांची तपासणी करण्यात येणार असून, आवश्यकतेनुसार औषधोपचारही उपलब्ध करून दिले जाणार आहे.

------------------------------------------

हवामान

अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, वाशिम आणि नागपूर या जिल्हयांमध्ये येत्या काही तासांत तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह वादळी वारा आणि हलक्या पावसाची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागान वर्तवली आहे.

------------------------------------------

एफआयएच हॉकी

एफ आय एच हॉकी चषक स्पर्धेच्या महिला गटात भारतीय संघान ६ गुण मिळवून उपान्त्य फेरी गाठली आहे. न्यूझीलंडमधे ऑकलंड इथं झालेल्या उपान्त्यपूर्व सामन्यात भारतान जपानचा २ विरुद्ध १ गोलन पराभव केला. पुरुष गटात भारताचा सामना आज जर्मनी बरोबर होणार आहे. स्पर्धेतल्या पहिल्या सामन्यात भारताला नेदरलँड्सकडून पराभव पत्करावा लागला.

-------------------------------------------

भीषण आग

भंडारा शहरातील गजबजलेल्या कपडा बाजार परिसरातील लालचंद कपडा शॉपमध्ये आज अचानक आग लागली. माहिती मिळताच अग्निशमन विभागाच्या दोन गाड्या घटनास्थळी दाखल होऊन आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. सुदैवान या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून मोठ्या प्रमाणावर मालमत्तेचे नुकसान झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

-------------------------------------------

वार्षिक सर्वेक्षण

केंद्रीय सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या वतीनं देशभरात राबवण्यात येत असलेल्या नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण मोहिमेत अकोला जिल्ह्यातल्या सर्वेक्षणाचा शुभारंभ आज जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या हस्ते  करण्यात आला. या सर्वेक्षणाद्वारे लघुउद्योग, व्यापारी आणि सेवा क्षेत्रातील वाहतूक, शिक्षण, आरोग्य आदी घटकांची आर्थिक आणि कार्यात्मक वैशिष्ट्यं नोंदवण्यात येणार आहेत. देशात हा उपक्रम मार्च २०२७ पर्यंत चालणार आहे.

-------------------------------------------

चित्रपट महामंडळ

अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या अध्यक्षपदी मेघराज राजेभोसले आणि उपाध्यक्ष पदावर धनाजी यमकर आणि आनंद शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. मुख्य कार्यवाह पदावर अभिनेता सुशांत शेलार याची निवड झाली आहे. तर खजिनदारपदी सुनील महाजन यांची निवड करण्यात आली.

-------------------------------------------